महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक - १० ऑक्टोबर, २०२३

## - : **प्रसिध्दीपत्रक**:-

**विषय**:- सेवा प्रवेश नियमानुसार टंकलेखन प्रमाणपत्र आवश्यक असलेल्या परीक्षांकरीता टंकलेखन कौशल्य चाचणीबाबत.

**संदर्भ**:- आयोगाचे क्रमांक एमआयएस-०१२२/सीआर-३१/२०२१/मा.तं., दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित लिपिक-टंकलेखक तसेच कर सहायक या टंकलेखन अर्हता आवश्यक असलेल्या संवर्गाच्या परीक्षांकरीता टंकलेखन कौशल्य चाचणी (Typing Skill Test) लागू करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदी व इतर बाबींचा साकल्याने विचार करुन आयोगाकडून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे:-

(१) लिपिक-टंकलेखक तसेच कर सहायक या संवर्गातील पदभरतीकरीता संगणक प्रणालीवर आधारित टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

(२) टंकलेखन कौशल्य चाचणी ही केवळ अर्हताकारी/पात्रता (Qualifying) स्वरुपाची असेल.

(३) लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्गाच्या भरावयाच्या पदांच्या तीनपट उमेदवार टंकलेखन कौशल्य चाचणीकरीता पात्र ठरविण्यात येतील.

(४) लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता मुख्य परीक्षेस अर्ज करतेवेळी उमेदवारांना मराठी किंवा इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणीपैकी कोणतीही एक टंकलेखन कौशल्य चाचणी निवडता येईल. उमेदवारांनी निवड केलेल्या मराठी किंवा इंग्रजी टंकलेखनाची कौशल्य चाचणी आयोगातर्फे घेण्यात येईल व त्या चाचणीमध्ये अर्हताकारी/पात्र (Qualifying) ठरणे आवश्यक असेल. तसेच कर सहायक संवर्गाकरीता उमेदवारांना मराठी व इंग्रजी या दोन्ही कौशल्य चाचणीमध्ये अर्हताकारी/पात्र (Qualifying) ठरणे आवश्यक असेल.

(५) टंकलेखन कौशल्य चाचणीचा तपशील :-

| अ.क्र. | तपशील | | | निकष |
|---|---|---|---|---|
| (१) | चाचणीकरीता पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या | | | भरावयाच्या पदांच्या तीनपट |
| (२) | टंकलेखन कौशल्य चाचणीचे स्वरुप | | लिपिक-टंकलेखक | मराठी किंवा इंग्रजी अर्हताकारी (Qualifying) |
| | | | कर सहायक | दोन्ही भाषेत अर्हताकारी (Qualifying) |
| (३) | चाचणीचे निकष | | | |
| | टंकलेखन | शब्द प्रतिमिनिट | KDPH (Key Depressions Per Hour) | वेळ |
| | इंग्रजी | ४० | १२००० | १० मिनिटे |
| | मराठी | ३० | ९००० | १० मिनिटे |
| (४) | त्रुटी/चुका मोजण्याची पध्दती | | | मराठीसाठी १५०० Key Depression व इंग्रजीसाठी २००० Key Depression नुसार तयार होणा-या शब्दांच्या शेकडा प्रमाणात. |
| (५) | पात्रतेसाठी सीमांकन मर्यादा/रेषा | | अराखीव | ७% |
| | | | मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | १०% |

(६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३ जून, २०१९ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना गट-क संवर्गातील पदावर नियुक्ती मिळाल्यास टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे माजी सैनिक आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांना टंकलेखन चाचणी अनिवार्य नाही.

(७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: अपंग २०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ अन्वये दिव्यांग उमेदवारांना लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यास टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे पात्र दिव्यांग आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांना टंकलेखन चाचणी अनिवार्य नाही.

(८) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक: अनाथ-२०२२/प्र.क्र.८४/का-०३, दिनांक ०७ जुलै, २०२२ अन्वये अनाथ उमेदवारांना लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यास टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे पात्र अनाथ आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांना टंकलेखन चाचणी अनिवार्य नाही.

(९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ, दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ अन्वये प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांना लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यास टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे सदर वर्गातून आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांना टंकलेखन चाचणी अनिवार्य नाही.

(१०) टंकलेखनातील त्रुटी/चुकांसंदर्भात टंकलेखनासाठी परीक्षेमधील परिच्छेदामध्ये Key Depression कितीही असले तरी, मराठीसाठी प्रथम १५०० Key Depression व ईंग्रजीसाठी प्रथम २००० Key Depression नुसार तयार होणा-या शब्दांच्या शेकडा प्रमाणात त्रुटी/चुका पात्रतेसाठी ग्राह्य धरण्यात येतील.

उदाहरणार्थ - १९०० key depression असलेल्या एखाद्या मराठी उता-यात प्रत्यक्ष पात्रता ठरविताना त्या उता-यातील पहिल्या १५०० key depression नुसार जर २३६ शब्द तयार होत असतील तर उमेदवारांच्या पात्रतेसाठी खालीलप्रमाणे निकष लागू होईल:-

अराखीव उमेदवार - २३६ शब्दांपैकी २१९ बरोबर शब्द

राखीव उमेदवार - २३६ शब्दांपैकी २१२ बरोबर शब्द

**२.** टंकलेखन कौशल्य चाचणीबाबतच्या इतर सुचना/माहिती आयोगाकडून वेळोवेळी अवगत करण्यात येईल.

**३.** प्रस्तुत कार्यपध्दत यापुढे घेण्यात येणा-या टंकलेखन कौशल्य चाचणीस लागू राहील.

ठिकाण:- नवी मुंबई

सहसचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग